REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 8 | ISSUE - 4 | JANUARY - 2019

# स्वातंत्र , समता व बंधुत्वाचे पाईक : लोकशाहीर आण्णाभाऊ साठे

**प्रा. श्रीरंग शामराव लोखंडे**
**राज्यशास्त्र विभाग,**
**यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, तुळजापूर, जि. उस्मानाबाद.**

मराठी साहित्यविश्वात साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे हे नाव अर्वाचीन मराठी साहित्याच्या इतिहासात अनेक अर्थांनी महत्तपूर्ण आणि वैशिष्टपूर्ण आहे. खऱ्या अर्थाने लोकोत्तर त्वाय कामगिरी करणारे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे स्मरण सर्वत्र केले जात आहे. खरे तर अण्णाभाऊ साठे हे केवळ साहित्यिक नव्हते तर त्यांचा पिंड हा कलावंताचा होता त्याचबरोबर पाईकः कष्टकरी , दलित , शोषित, पीडित , वंचित अशा सर्वच घटकांचा ते बुलंद आवाज होते. जाकाहार त्यांच्या साहित्याने जगण्याला प्रेरणा दिली असून अण्णा भाऊंच्या साहित्यातून वास्तववादी जगणं स्पष्ट केलं आहे. अण्णा भाऊ साठे यांनी दलित , शोषित , पीडित अशा सामान्य माणसाला केंद्रस्थानी आणून त्यांची सुख-दुःख उजागर करून वास्तववादी समाजदर्शन उभे केले आहे. गार कलेच्या माध्यमातून अण्णा भाऊ साठे यांनी या समाज समूहावरील अन्याय , अत्याचाराला वाचा फोडली. समाजाला भानावर आणण्याचे काम केले. अन्यायाविरूध्द लढा देण्याची उर्मी जागवली. अण्णा भाऊ साठे हे असे साहित्यिक होते तसेच ते लढवय्ये नेते कार्यकर्तेही होते अण्णा भाऊंचे साहित्य केवळ मराठीच नव्हे, तर जागतिक साहित्याचा अनमोल ठेवा आहे. अशा थोर साहित्य सम्राटास विनम्र अभिवादन !

अण्णाभाऊ साठे यांच्यासारखे मनस्वी कलावंत तर समाज व्यवस्थेविरोधात अधिकच त्वेषाने लढण्यासाठी मैदानात उतरतात. त्यामुळे एकाच वेळी त्यांनी साहित्यिक क्षेत्रात जशी भरीव कामगिरी केली तशीच शोषित, कष्टकरी, दलित समूहाच्या उत्थानासाठीही तेवढेच मोठे योगदान दिले. साहित्य आणि चळवळ अशा दोन्ही क्षेत्रात त्यांनी आपला भरीव असा ठसा उमटविला. मात्र ते ज्या डाव्या चळवळीत होते तेथे त्यांची उपेक्षा होत गेली आयुष्याच्या उत्तरार्धात नैराशेच्या गर्तेत फेकले गेले. मात्र सामाजिक बांधिलकीची माळ त्यांनी अखेरपर्यंत तुटू दिली नाही. त्यामुळेच ते भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या महान कार्याकडे आकर्षित झाले आणि 'जग बदल घालूनी घाव, सांगून गेले मज भीमराव' हे क्रांतीगीत लिह शकले. महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी समाजातील समस्त शोषित, वंचितांसाठी जो संघर्ष केला त्यासाठी जे कष्ट उपसले त्याला तोड नसल्याचे दिसून आल्याने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचाच मार्ग खऱ्या अर्थाने सामाजिक समतेकडे जाणारा आहे याची जाणीव अण्णा भाऊ साठे यांनी करून दिली.

अण्णा भाऊ साठे यांनी आपल्या असामान्य प्रतिभा आविष्काराने आधुनिक मराठी साहित्यात एक नवे पर्व सुरू केले. आपल्या सिद्धहस्त लेखणीतून त्यांनी समताधिष्ठित समाजरचनेचे स्वप्न पाहिले आणि ते साकारण्यासाठी साहित्यातून प्रबोधनाचा संगर चेतवला.



त्यांच्या मुल्याधिष्ठित साहित्याने भाषा आणि प्रांताच्या मर्यादा ओलांडून जगभरातील साहित्यविश्वात एक अनोखा ठसा उमटविला. साहित्य हे राजविलासी लोकांच्या मनोरंजनाचे साधन नसून ; दीनदुबळया, शोषित, उपेक्षितांचे दुःख जगाच्या वेशीवर टांगणारे एक प्रभावी माध्यम आहे हे अण्णा भाऊंनी दाखवून दिले. अण्णा भाऊंचा दृष्टिकोण मानवतावादी होता. या देशात परंपरेने वाहात असलेली सर्व सुखसोयीची गंगा काही

ठराविक मूठभर लोकांपर्यंतच वाहात होती तर दुसऱ्या बाजुला दुःख दारीद्रयाच्या खाईत इथला मोठा बहुजन समाज गाडला जात होता. समाज व्यवस्थेने माणसा माणसात निर्माण केलेली ही दरी अण्णा भाऊंनी अचुक हेरली. त्यामुळे बहुजन समाजातले नायक अण्णाभाऊंनी आपल्या साहित्यातून उभे केले. " दगडाजवळ दगड मांडला की त्याची एक प्रचंड भीत तयार होते आणि माणसाजवळ माणूस आला की त्याचा एक मोठा समाज निर्माण होतो." हा विचार अण्णा भाऊंनी आपल्या साहित्यातून मांडला आणि संपूर्ण बहुजन समाज जोडण्याचे फार मोठे कार्य अण्णा भाऊंनी केले.

अण्णाभाऊ साठे हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची सामाजिक न्यायाची , शोषण मुक्तीची क्रांतीकारी चळवळ जवळून पहात होते. त्यामुळे या चळवळीचाही परीणाम अण्णा भाऊंच्या लेखनावर झालेला दिसून येतो. त्यामुळे अण्णाभाऊ आंबेडकरी चळवळीकडे, विचाराकडे आकर्षित झाले होते याची अनेक उदाहरण आपल्याला देता येतील. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दलित बहुजनांना शिका. संघटित व्हा आणि आपल्यावर होणाऱ्या अन्यायाच्या विरोधात संघर्ष करा अशी शिकवण दिली तसेच बुद्धाने सांगितलेल्या प्रज्ञा. शील, करूणा, मैत्री आणि प्रेम या पंचशीलाचे आयुष्यभर पालन केले त्याचबरोबर स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय ही लोकशाहीची सर्व मूल्ये समाजात रूजविण्याचा अहोरात्र प्रयत्न केला ती मुल्ये अण्णा भाऊंच्या कथा, कादंबऱ्या आणि शाहिरीमधून पाना पानावर आविष्कृत झाली आहेत. अण्णाभाऊ आपल्या अनुयायांना बाबासाहेबांच्या विचाराने प्रस्थापित व्यवस्थेच्या जुनाट रूढी परंपरेच्या, विषमतेच्या मुळावर घाव घालण्याचे आवाहन करताना म्हणतात , ' जग बदल घालुनी घाव , सांगूनी गेले मला भीमराव' या कवनातून अण्णाभाऊंच्या साहित्यातील विचारांची दृष्टि स्पष्ट होते. यापेक्षा वेगळे सांगण्याची आवश्यकता नाही. स्वातंत्र्य बंधूता आणि न्याय मूल्यांचा प्रत्यय अण्णाभाऊंच्या सर्वच साहित्यकृतीतून येतो. एक फकिरा कादंबरी जरी विचारात घेतली तरी पुरेशी आहे.

अण्णाभाऊ साठे या मराठी सारस्वताने गेल्या दोन शतकात अनेक लेखक कवी व नाटककार पाहीलेले आहेत परंतु अपवाद वगळता मराठी लेखकामध्ये पौर्वात्य व पाश्चिमात्य वाड्मयीन दंडकाचा वापर करून लिखाण करण्याची प्रवृत्ती दिसते. लेखणविषय, नायक व गौरवीकरण हा लेखणाचा प्रमुख हेतू दिसतो. भारतीय समाज वर्णव्यवस्थेच्या कुलूपबंद पेटीमध्ये - नाटकत्व हे नेहमीच लक्षात घेणे गरजेचे आहे. अभिजनांबरोबर बहूजनांनाही मुल्यव्यवस्था असते. आणि बऱ्याच वेळेस स्वातंत्र्य, समता व बंधूता आणि न्याय यांच्या कसोटयांवर बहुजन व्यवस्थाही अभिजन मुल्यव्यवस्थेला वरचढ ठरते. कारण विषमतेवर विश्वास ठेवणाऱ्यापेक्षा समतेची निकट भासणाऱ्या दलित व श्रमिक वर्गाला भाकरीच्या चंद्रासाठी संघर्ष करतांनाच आपली मुल्यव्यवस्था जपावी व वाढवावी लागते.

अण्णाभाऊ साठे यांनी आपल्या कोणत्याही कथा-कादंबरीतून देवधर्म, अंधश्रद्धा रूढी परंपरांचे समर्थन केले नाही. उलट समाजाला विज्ञानवादी विचार दिला. अण्णाभाऊंच्या साहित्याचा इथे विचार केला असताना अण्णा भाऊ यांचे बंडखोर, क्रांतीकारी विचार सर्वच साहित्य प्रकारातून आलेले आहेत म्हणून या साहित्याची एकांगी समीक्षा न करता सर्वांगीन समीक्षा होणे आवश्यक आहे. अण्णा भाऊंनी स्वातंत्र्य, समता व बंधूता आणि न्याय या लोकशही मुल्यांचा सर्वच साहित्यकृतीतून पुरस्कार केला आहे. दलितामध्ये स्वाभिमानी चळवळी निर्माण व्हाव्यात म्हणून अण्णाभाऊंनी 'सोन्याचा मणी, 'उपकाराची फेड', 'बरबादया कंजारी', अश्यासारख्या अनेक कथांची निर्मिती केली. तर 'फकिरा', 'वारणेचा वाघ', 'मंगला', 'डोळे मोडीत राधा चाले' यांसारख्या कादंबऱ्या लिहून अन्यायविरोधात बंडखोर नायक नायिका उभ्या करून स्वाभिमानी समाजाचे स्वप्न पाहिले परंतु आजचे कार्यकर्ते स्वार्थासाठी इकडून तिकडे , तिकडून इकडे कोलांडया मारतांना दिसत आहेत. अण्णा भाऊंच्या साहित्यातील विचार , जाणीवा समजून घेवून अनुयायांनी वाटचाल केली तर अण्णा भाऊंचे कार्य समजुन घेण्याचे सार्थक होईल.

## संदर्भसूची : -

१. शिंदे रणधीर, अण्णाभाऊ साठे : साहित्य आणि समीक्षा, श्रमिक प्रतिष्ठान कोल्हापूर पृ. ९

२. अण्णाभाऊ साठे निवडक वाङ्मय (कादंबरी खंड-१), प्रकाशक साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चरित्र साधने प्रकाशन समिती, महाराष्ट्र शासन, प्रथमावृत्ती १ मे २०१७ पृ१५

३. कोरडे बजरंग, भारतीय साहित्याचे निर्माते : अण्णाभाऊ साठे, साहित्य अकादमी प्रकाशन, नवी दिल्ली, प्रथमावृत्ती २००१ पृ.१७